## प्रधानमंत्री जीवन ज्योती विमा योजनेअंतर्गत (पीएमजेजेबीवाय) दाव्याची निराकरण पद्धती

खातेधारकाच्या नामनिर्देशित व्यक्तीला रू. 2,00,000/- इतकी दाव्याची रक्कम देय असेल. त्या व्यक्तीला त्याच्या/तिच्या वयाच्या 18 व्या वर्षापासून (पूर्ण) ते वार्षिक नूतनीकरणाच्या तारखेला 55 वर्ष वय पूर्ण होईपर्यंत (जवळचा वाढदिवस) जोखीम संरक्षण देण्यात येईल म्हणजे 55 वर्ष वय पूर्ण झाल्यानंतर (जवळच्या वाढदिवसाला) आणि बँकेतील खाते बंद केल्यास किंवा विमा सुरू ठेवण्यासाठी पुरेशी शिल्लक नसल्यास पात्रता रद्द होईल.

इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनीद्वारा रू. 2,00,000/- इतक्या रकमेचा मृत्यूचा दावा पूर्ण करण्यात येईल. ह्या प्रमाणे कार्यपद्धतीची अंमलबजावणी करण्यात येईल:

**नामनिर्देशित व्यक्तीने खालील टप्पे पूर्ण करावेत:**

1. ग्राहकाला ज्या ''बचत बँकेच्या खात्याद्वारे'' संरक्षण देण्यात आले असे खाते ज्या बँकेत होते त्या बँकेशी नामनिर्देशित व्यक्तीने एलएच्या मृत्यूच्या प्रमाणपत्रासह संपर्क साधावा.
2. नामनिर्देशित व्यक्तीने बँकेकडून क्लेम फॉर्म आणि डिस्चार्ज रिसिट घ्यावे किंवा तो/ती इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्सच्या वेबसाईटवरून ते डाऊनलोड करून घेऊ शकतो
3. नामनिर्देशित व्यक्तीने क्लेम फॉर्म आणि डिस्चार्ज रिसिट पूर्ण भरावे.
4. नामनिर्देशित व्यक्तीने बँकेकडे क्लेम फॉर्म आणि डिस्चार्ज रिसिट व त्यासोबत मृत्यूचे प्रमाणपत्र आणि नामनिर्देशित व्यक्तीच्या बँकेच्या खात्याची रद्द केलेल्या धनादेशाची फोटोकॉपी सादर करावी.

**बँकेने करण्याची कार्यवाही**

1. मृत्यूची माहिती मिळाल्यानंतर बँकेने त्यांचे रेकॉर्डस तपासून सदस्याचे संरक्षण सुरू होते का हे पहावे म्हणजे सदस्याच्या मृत्यूच्या अगोदर वार्षिक नूतनीकरणाच्या तारखेला म्हणजे 1 जूनला संरक्षणासाठी प्रिमियम वजा केली होती का आणि इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनीला ला भरली होती का, ते पहावे.
2. बँकेने त्यांच्यापाशी उपलब्ध असलेल्या रेकॉर्डसद्वारा दाव्याचे प्रपत्र आणि नामनिर्देशनाचा तपशिल पडताळून पहावा.
3. नामनिर्देशित व्यक्तीने सादर केलेल्या परिशिष्टांनुसार, बँक क्लेम फॉर्म आणि डिस्चार्ज रिसिटमधील त्यांचा भाग भरून पूर्ण करेल.
4. बँकेने खालील दस्तऐवजांसोबत क्लेमची माहिती इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनीच्या मुख्य कार्यालयाकडे सादर करावी.

   ए. पूर्ण भरलेला क्लेम फॉर्म

   बी. मृत्यूचे प्रमाणपत्र

   सी. नामनिर्देशित व्यक्तीच्या रद्द केलेल्या धनादेशाच्या फोटोकॉपीसह डिस्चार्ज रिसिट

*इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स चा पत्ता:*

पीएमजेजेबीवाय– क्लेम डिपार्टमेन्ट
इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनी लिमिटेड
301, 'बी' विंग, द क्यूब, इन्फिनिटी पार्क,
दिंडोशी–फिल्म सिटी रोड
मालाड (पूर्व), मुंबई – 400 097

Contact Person: Mr. Shankar Patil
Phone No.: 022-3325 9743
Mail ID: claims.pmjjby@indiafirstlife.com

**इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्सने करण्याची कार्यवाही**

1. क्लेम फॉर्म सर्व बाबतीत पूर्ण भरला आहे का आणि सर्व आवश्यक दस्तऐवजांसह क्लेम सादर केला आहे का हे पडताळून पहावे. तसे नसल्यास, संबंधित बँकेला तसे कळवावे.
2. जर दावा दाखल करण्यायोग्य असेल तर सदस्याचे संरक्षण सुरू आहे का आणि इतर कोणत्याही खात्याद्वारा सदस्याचा मृत्यूचा दावआ पूर्ण केला नाही हे दाव्याचा संघ तपासून पाहील.
3. वरील प्रक्रियेमुळे पीएमजेजेबीवाय अंतर्गत कोणत्याही खात्यातून दावा दोनदा केलेला नाही याची काळजी घेतली जाईल. जर एखादा दावा पूर्ण केला असेल तर नामनिर्देशित व्यक्तीला तसे कळविण्यात येईल व त्याची एक प्रत बँकेला पाठविण्यात येईल.
4. जर संरक्षण सुरू असेल आणि सदर सदस्याचा दावा पूर्ण केला नसेल तर नामनिर्देशित व्यक्तीच्या खात्यात पैसे पाठविण्यात येतील आणि नामनिर्देशित व्यक्तीला त्या संदर्भातील पत्रव्यवहार पाठविण्यात येईल व त्याची एक प्रत बँकेला पाठविण्यात येईल.
5. दाव्याचे पैसे राष्ट्रीय इलेक्ट्रॉनिक नीधि हस्तांतरण (एनईएफटी) द्वाराच फक्त पाठविण्यात येतील.

जर दावा करणाऱ्या व्यक्तीने दाव्याचे प्रपत्र थेट इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनीला पाठविले असेल तर इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनीने संबंधित बँकेकडून आवश्यक पडताळणी करून घेण्यासाठी ताबडतोब ते मृत खातेधारकाच्या संबंधित बँकेकडे ते सादर करावे. संबंधित बँकेची शाखा दाव्याची प्रक्रिया पूर्ण करण्यासाठी इंडियाफर्स्ट लाईफ इन्शूरन्स कंपनीच्या मुख्य कार्यालयाकडे क्लेम फॉर्म पाठवेल.